**छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या संस्थेच्या विविध उपक्रमांसाठी शासनाच्या नियोजन विभागास भूखंड वाटप करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः सिआयडी-३३२२/अनौ.सं.८/प्र.क्र.४५/नवि-१०**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १३ जून, २०२२

**प्रस्तावना :-**

छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या संस्थेची दि.२५.६.२०१८ रोजी कंपनी अधिनियम,२०१३ च्या कलम ८ अन्वये नोंदणी करण्यात आली आहे. मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी या लक्षित गटाच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी या संस्थेची महाराष्ट्र शासनाने स्थापना केली असून ही संस्था दि.११.२.२०१९ रोजी पासून कार्यान्वित झाली आहे.

सारथी संस्थेमार्फत मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी या लक्षित गटाच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक उन्नतीच्या अनुषंगाने विभागीय स्तरावर वसतीगृह, प्रशिक्षण व कौशल्य विकास केंद्रे, महिला सक्षमिकरण व इत्यादी सारखे सामाजिक बांधिलकी जपणारे कार्य करण्यात येणार आहे. सदर संस्थेच्या विनंतीच्या अनुषंगाने मंत्रीमंडळाच्या दि.२६.०५.२०२२ रोजीच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला असुन त्यानुसार पुढीलप्रमाणे शासन निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

राज्यातील मराठा तसेच कुणबी- मराठा प्रवर्गातील शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक मागास लोकांच्या विकासासाठी स्थापन करण्यात आलेल्या छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या राज्य शासनाच्या अंगीकृत संस्थेच्या विविध उपक्रमांसाठी नवी मुंबई येथील खारघर नोड मधील सेक्टर क्र.३७, क्षेत्र ३५०० चौ.मी. चा भूखंड एक विशेष बाब म्हणुन एक रुपया प्रति चौ.मी. या नाममात्र दराने भाडेपट्याने शासनाच्या नियोजन विभागास वाटप करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२२०६१३१४४८२८४८२५ असा आहे. सदरहू शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHINDE SUBRAO NARAYAN

Digitally signed by SHINDE SUBRAO NARAYAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GOVERNMENT OF MAHARASHTRA,
2.5.4.20=ffa7b5a27faed7560194e6272933cfa60dca1eb8ab54859eae7920c9d0d1f622, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=E5BB5862D0E131A274D92F7A1ACEF953E01301C1B0FB615DC6CCE4812BDED257, cn=SHINDE SUBRAO NARAYAN
Date: 2022.06.13 17:00:26 +05'30'

**( सु. ना. शिंदे )**
सह सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य,यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय, मुंबई.
३. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई

७. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.

८. सचिव, संसदीय कार्य विभाग, मंत्रालय,मुंबई

९. व्यवस्थापकीय संचालक,शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित (सिडको), निर्मल, दुसरा मजला, नरीमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१.

१०. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मुंबई.

११. महासंचालक, माहिती व जन संपर्क महासंचालनालय, मुंबई

१२. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

१३. महालेखापाल, (लेखापरिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई

१४. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई/ अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

१५. निवड नस्ती (नवि-१०).